महावितरण
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/ 08570 दिनांक : 24 MAR 2015

# परिपत्रक

**विषय :** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy अंतर्गत Top Up Facility घेतलेल्या कर्मचाऱ्यांची विमा हप्त्याची रक्कम माहे मार्च / एप्रिल २०१५ च्या वेतनातून कपात करणेबाबत.

**संदर्भ :** सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/७३१, दि. ०८.०१.२०१५

**************

म.रा.वि.मं. सुत्रंधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांचा वेतन पुनर्निर्धारण करार व्यवस्थापन प्रतिनिधी व कामगार संघटना प्रतिनिधी यांच्यामध्ये दि. २६/०६/२०१४ रोजी करण्यात आला होता. वेतन पुर्ननिर्धारण करारातील मुद्दा क्र. ८ नुसार कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबियातील ०५ सदस्यांसाठी ग्रुप मेडीक्लेम इन्शुरन्स पॉलिसी नव्याने सुरु करण्याबाबतचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला होता. त्यानुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र. औसंवि/ब/७३१, दि.०८/०१/२०१५ नुसार महावितरण कंपनीतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy दि. ०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ पर्यंत लागू करण्यात आली आहे.

उपरोक्त परिपत्रकातील मुद्दा क्र. ०९ नुसार MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy अंतर्गत कर्मचाऱ्यांना रु. तीन लाखापेक्षा जास्तीचा वैद्यकीय विमा घ्यावयाचा असल्यास, कर्मचारी रु. ३ लाखावरील विमा रकमेचा हप्ता वैयक्तिकपणे भरु शकतील असा पर्याय MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला होता.

त्यानुषंगाने, सर्व कर्मचाऱ्यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चे ऑनलाईन नोंदणी केलेले असून काही कर्मचाऱ्यांनी Top up Facility चा विकल्प निवडलेला आहे. सदर Top up Facility घेणाऱ्या इच्छुक कर्मचाऱ्यांची यादी ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे यांच्यामार्फत प्राप्त झालेली आहे. सदरची यादी महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर MSEBHCL Mediclaim या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. सदर इच्छुक कर्मचाऱ्यांना Top up Facility देण्याबाबत ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे यांनी संमती दर्शविली आहे. सबब, सर्व इच्छुक कर्मचाऱ्यांना या योजनेअंतर्गत लाभ मिळणेसाठी विमा हप्त्याची रक्कम विमा कंपनीकडे त्वरीत जमा करणे आवश्यक आहे. यानुषंगाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील परिमंडळाअंतर्गत कर्मचाऱ्यांची सोबत जोडलेल्या यादीनुसार किंवा उपरोक्त संकेतस्थळावरील उपलब्ध यादीनुसार त्यांच्या भ.नि.नि.क्रमांक व नावांसमोरील दर्शविलेली विमा हप्त्याची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांच्या माहे मार्च २०१५ / एप्रिल २०१५ च्या वेतनातून कपात करुन घेण्यात यावी. (ज्या कार्यालयाचे माहे मार्च २०१५ चे पे बील पूर्ण झाले असेल, अशा परिस्थितीत माहे एप्रिल २०१५ च्या वेतनातून कपात करण्यात यावी.)

तसेच ज्या कर्मचाऱ्यांची Top up Facility करीता निवड केलेली असून देखील अशा कर्मचाऱ्यांची नांवे उपरोक्त यादीमध्ये नसल्यास संदर्भीय परिपत्रकातील सुचनांचा अवलंब करुन कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार त्यांची विमा हप्त्याची रक्कम कपात करण्यात यावी. तसेच, सोबतच्या यादीमधील ज्या कर्मचाऱ्यांना Top-up Facility चा विकल्प मागे घ्यावयाचा असेल त्यांनी लेखीस्वरुपात त्यांच्या संबंधित कार्यालयास कळविणे बंधनकारक आहे. अशा कर्मचाऱ्यांची विमा हप्त्याची कपात करण्यात येणार नाही. ज्या कर्मचाऱ्यांनी अतिरिक्त विमा हप्त्याचा विकल्प निवडलेला आहे व विमा हप्त्याची कपात केलेली आहे, अशा कर्मचाऱ्यांनांच Top-up Facility चा लाभ घेता येईल. सदर रक्कम एकत्रितपणे धनादेशाद्वारे मुख्य कार्यालयामार्फत विमा कंपनीस अदा करण्यात येईल. सदर रक्कम विमा कंपनीकडे वर्ग केल्यानंतरच कर्मचाऱ्यांना योजनेचा लाभ घेता येईल. माहे मार्च २०१५ मध्ये विमा हप्त्याची कपात केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची परिमंडलनिहाय नावांची यादी सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात भरुन दि. ३०.०३.२०१५ पूर्वी irdho123@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी. तसेच माहे एप्रिल २०१५ मध्ये विमा हप्त्याची कपात केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची परिमंडळनिहाय नावांची यादी सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात भरुन दि. ३०/०४/२०१५ पूर्वी irdho123@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावी.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत (Hard Copy) प्रसारित करण्यात येणार नाही. कर्मचाऱ्यांच्या सोईकरिता सदर परिपत्रक महावितरणच्या Intranet - RAPDRP या संकेतस्थळावरील Industrial Relations Department यावर देखील उपलब्ध आहे.

( डॉ. मुरहरी केळे)
कार्यकारी संचालक (मासं) (प्रभारी)

प्रति,
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी, म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादित.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :
१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.
२) संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प), म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.